**Review Of Research**
**ISSN 2249-894X**

**Impact Factor : 3.1402(UIF)**
**Volume - 5 | Issue - 1 | Oct - 2015**

# बार्शी शहरातील डाळ उद्योगाची वाटचाल

**प्रा. डॉ. बळीराम हणुमंत जाधव**

## प्रस्तावना :



वैभवशाली महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. इ. स. पू. ९० ते इ. स. ३०० या काळात सोलापूरच्या प्रदेशावर सातकर्णी सत्ताधिशांचे राज्य होते. पुढे इ. स. ५५० ते इ. स ७६० या काळामध्ये चालुक्याचे, इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांचे, त्यानंतर १३ व्या शतकापर्यंत देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. या यादवांचा पुढे मुस्लिमांनी पाडाव केल्यानंतर हा प्रदेश इ. स १३४७ मध्ये हसण गंगू याने स्थापन केलेल्या बहामणी सत्तेच्या अधिपत्त्याखाली आला. प्रशासनाच्या सोयीसाठी त्याचे ११ विभाग पाडण्यात आले. पुढे सत्ता संघर्षातून या विभागांपैकी बार्शी, माढा, परांडा व करमाळा हे प्रदेश 'ख्वाजा जहानला' कडे अनेक वर्ष राहिले. नंतर हा प्रदेश निजामशहाच्या अधिपत्त्याखाली येऊन, त्याने हा प्रदेश त्यांच्याकडे आलेल्या निंबाळकरांना दिला.[१] १९ फेब्रूवारी १८१८ रोजी जनरल स्मिथ याने पेशव्यावर मिळविलेल्या विजयाने सोलापूर जिल्हा ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.[२]

इ. स. १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर तत्कालीन सोलापूरच्या प्रदेशातील २६१ गावे ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली आली. यातील १२३ गावे बार्शी तालुक्यातील होती. इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगी आणि मुद्देबिहाळ यांचा मिळून सोलापूर जिल्हा तयार झाला. इ. स. १८६४ मध्ये तो पुन्हा विखुरला.[३] इ. स. १९५६ च्या राज्य पुर्नरचनेनुसार सोलापूर जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यामध्ये होता. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सोलापूर हा महाराष्ट्रातील एक जिल्हा बनला.[४] या सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी हा एक औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या समृध्दशाली तालुका आहे.

बार्शी तालुक्यामध्ये बार्शी हे एकमेव शहर आहे. व्यापार उद्योगधंद्याच्या दृष्टीने बार्शी शहराची ओळख फार जुनी व महत्वाची आहे. पूर्वी निजाम व मोगल यांच्या सीमेवर व नंतर पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांच्या सीमेवर असलेल्या बार्शी शहराला संपन्न अशी व्यापारी पार्श्वभूमी लाभलेली आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील आर्थिक घडामोडीचे महत्वाचे केंद्र अशी बार्शी शहराची ओळख निर्माण झाली. या ठिकाणी होणारी आर्थिक उलाढाल लक्षवेधक आहे. 'बार्शी शहर' हे जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे व्यापारी ठिकाण होते. निजामाच्या राज्यातील सर्व प्रकारचा माल बार्शी मार्गेच पश्चिमेकडे पाठविला जात असे. बालाघाटातील लातूर, गंगाखेड, मोमीनाबाद, नांदेड, पाथरी, हिंगोली आणि बीड या ठिकाणाहून मागवलेला माल व्यापाऱ्यांना बार्शीमार्गेच न्यावा लागत असे. बार्शी हे निजाम व मोगल यांच्या सीमेवरील ठिकाण असल्याने या ठिकाणी मालाची देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणात होत असे. या ठिकाणी मुंबईचे व स्थानिक व्यापारी यांच्या शिवाय युरोपीय व्यापारी व्यापार करत होते.[५] पूर्वीपासून बार्शी शहरात विविध उद्योगधंदे सुरू आहेत. काही मोठ्या स्वरूपामध्ये आहेत तर काही लहान स्वरूपामध्ये आहेत. यापैकी सूत व कापड उद्योग, डाळ उद्योग, साखर उद्योग व तेल उद्योग हे बार्शी तालुक्यातील प्रमुख उद्योगधंदे आहेत.

बार्शी तालुक्यातील डाळ उद्योग हा एक महत्वाचा उद्योग आहे. तो प्रामुख्याने शहरी भागामध्ये केंद्रीत झालेला आहे. दगडी जात्यामध्ये तूर, मुग, उडिद अशी विविध कडधान्ये घालून डाळ तयार करण्याची पध्दत परंपरेने चालत आलेली आहे. यासाठी संपूर्ण कुटुंबाला राबावे लागत असे. यामध्ये स्त्रियांची भूमिका महत्वपूर्ण होती. दगडी जाते ओढण्याचे काम, तसेच घरोघरी जाऊन डाळ विकण्याचे काम त्यांना करावे लागे. आजही ग्रामीण भागामध्ये अशाच पध्दतीने डाळ निर्मिती केली जाते. अर्थात त्याचे स्वरूप व उत्पादन मर्यादित असते. तालुक्यामध्ये या डाळ उद्योगाला यांत्रिक दर्जा मिळवून देण्याचे काम श्री. धोंडीराम नंदराम खटोड यांनी केले. त्यांनी इ. स. १९२५-२६ च्या दरम्यान बार्शी तालुक्यामध्ये सर्वप्रथम यंत्राच्या सहाय्याने डाळ निर्मिती करण्यास सुरूवात केली. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल म्हणजेच तूर, मुग, उडिद अशी विविध कडधान्यांची बार्शी बाजारपेठेमध्ये तालुक्यातून व संपूर्ण मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात आवक होते. त्यामुळे येथील डाळ उद्योगाच्या वाढीस चालना मिळाली. येथील डाळ संपूर्ण भारतामध्ये विशेषत: दक्षिण भारतामध्ये खूप प्रसिध्द आहे. येथील हरण छाप, कमळ छाप, सिंह छाप, सूर्य छाप, छोकरा छाप इत्यादी डाळी महाराष्ट्रासह तामिळनाडू, कर्नाटक व मध्य प्रदेश या प्रांतात खूप प्रसिध्द आहेत. [६]

इ. स. १९५४-५५ अखेर बार्शीमध्ये ९ डाळ कारखाने सुरू होते. यावर्षी बार्शीच्या तूरडाळीस दक्षिण भारतातून मागणी वाढल्यामुळे व तुरीची आवक फारच कमी झाल्यामुळे तुरीचे भाव खूप वाढले होते.[७] इ. स. १९५६ मध्ये बार्शी मार्केट क्षेत्रात तुरीचे पीक दरवर्षापेक्षा कमी होते. परंतू मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात तुरीची आवक झाली. तूरडाळीच्या उत्पादनाचे बार्शी हे मोठे केंद्र असल्याने व येथील डाळीला संपूर्ण देशात विशेषतः दक्षिण भारतामध्ये खूप मागणी असल्याने तुरीला येथे नियमित व मोठ्या प्रमाणात मागणी असते. मे १९५७ मध्ये बार्शीच्या डाळीची मागणी वाढल्याने तुरीचे भाव वाढले. मात्र पावसाळ्यात डाळ कारखानदारांना डाळीचे वाळण करता येणे शक्य नसल्याने पावसाळ्यामध्ये तुरीची मागणी कमी असते. त्यामुळे पावसाळ्याच्या दरम्यान तुरीचे भाव कमी असतात. येथील तूरडाळीची निर्यात सर्वस्वी रेल्वेवरच अवलंबून आहे. त्यामुळे या डाळ वाहतुकीसाठी किती वॅगन पुरवठा होतो यावर या उद्योगाचे स्थैर्य अवलंबून होते. इ. स. १९५६-५७ मध्ये मिरजवरून होणारा रेल्वे वॅगनचा पुरवठा बंद झाला. त्याचा फार विपरित परिणाम येथील डाळ उद्योगावर झाला. त्यामुळे बार्शी मार्केट कमिटीच्या तत्कालीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्याशी चर्चा करून रेल्वे वॅगनचा पुरवठा सुव्यवस्थित केला. त्यामुळेच इ. स. १९५६-५७ मध्ये बार्शीतून मुंबई, पुणे, म्हैसूर, सांगली, कोल्हापूर, मद्रास, गुजरात बरोबरच राज्यात १३० रेल्वे वॅगन्स डाळ निर्यात झाली. सहाजिकच येथील डाळ कारखानदारामध्ये नवा उत्साह निर्माण झाला.[८]

औद्योगिक क्रांतिपूर्वीच्या काळात व्यापार, उद्योगधंदे सर्वस्वी स्थानिक स्वरूपाचे होते. उत्पादकांपासून वितरकांपर्यंत किंवा व्यापाऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत मालाची वाटचाल अगदी सरळ मार्गाने होती. भावातील चढ-उताराचे धोके कमी होते. कारण सर्व व्यवहार थोडक्या काळात पूर्ण होत. परंतू औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रयुगाला सुरूवात झाली. त्यामुळे उत्पादन, व्यापार, दळणवळण यांच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झाला. व्यापार व उद्योगधंदे यांचे प्रादेशिक स्वरूप कमी होऊन त्यांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे उत्पादक व ग्राहक यांच्या दरम्यान होणाऱ्या मालाच्या वाटचालीचे अंतर व कालावधी वाढला. त्यामुळे अशा उलाढालीत भावातील अस्थिरतेचे धोके निर्माण झाले. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी कारखानदार व व्यापारी यांनी केलेल्या प्रयत्नातून ' वायदे बाजाराची ' उत्क्रांती झाली. आज या वायदे बाजाराला आधुनिक बाजार व्यवस्थेचे अत्युच्च शिखर समजण्यात येते. वायदे बाजारामुळे उत्पादक, ग्राहक व मध्यस्त यांना भावातील हेलकाव्यापासून संरक्षण मिळून लाभप्रेरीत व्यापाऱ्यांमध्ये धोक्याचे केंद्रीकरण होते. वायदे बाजारामुळे निरनिराळ्या बाजारपेठांतील विविध हंगामातील मालाच्या बाजारभावाचा समन्वय घालण्यास मदत होते.[९] बार्शीच्या डाळ उद्योगाच्या विकासात वायदे बाजाराचे मोठे योगदान आहे.

इ. स. १९५७ मध्ये बार्शी तालुका व मराठवाड्यात तुरीचे पीक समाधानकारक नव्हते, त्यामुळे बार्शी पेठेमध्ये तुरीची आवक कमी झाली. त्यातच स्थानिक डाळ कारखानदारांनी मद्रास, मुंबई व स्थानिक खरेदीदार व्यापारी यांच्याशी तूर डाळीचे वायद्याचे सौदे मंदीत केले होते. तूरीचा भाव १५ ते १६ रूपये प्रती मण असल्यास डाळीचा भाव १९ रूपये प्रती मण असणे अपेक्षित असते. परंतू स्थानिक डाळ कारखानदारांनी हे सौदे पूर्वीच १७ रूपये प्रती मण याप्रमाणे दिले होते. साहजिकच डाळ कारखानदारांनी तुरीचे भाव मंदीत काढले. त्यामुळे या कालावधीत तुरीची आवक फारच कमी झाली. पुढे जून १९५८ मध्ये तुरीची आवक संपल्याने व व्यापाऱ्यांजवळही तुरीचे साठे नसल्याने तूर व तूरडाळीचे भाव वाढले. त्यामुळे येथील डाळ कारखानदारांना दिलासा मिळाला.[१०]

इ. स. १९५८ मध्ये बार्शी पेठेतील तुरीची आवक मागील वर्षापेक्षा निम्म्यावरच आली. त्यामुळे तुरीचे भाव वाढल्याने स्थानिक डाळ कारखानदारांनी तुरीचे अथवा तूरडाळीचे साठे केले नाहीत. शिवाय तुरीवर ॲडव्हान्स देणे बँकांनी बंद केले होते. याचा प्रतिकुल परिणाम बार्शीतून दक्षिण भारतात होणाऱ्या डाळ पुरवठ्यावर झाला. दक्षिण भारतात डाळीचा तुटवडा भासला. जून १९५९ अखेर डाळीस मागणी वाढल्याने बार्शीच्या डाळ कारखानदारांनी उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांतून तूर मागवून तूरडाळीचा पुरवठा सुरळीत केला. यामुळे स्थानिक डाळ कारखानदारांना याचा खूप फायदा होऊन तूरडाळीला चांगला भाव मिळाला. यामुळे याही वर्षी शहरातील डाळ कारखान्यांच्या संख्येमध्ये एकाने भर पडून ही संख्या ११ इतकी झाली होती.[११]

इ. स. १९६० मध्ये बार्शी पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात तुरीची आवक झाली होती. ३ फेब्रुवारी १९६० रोजी २००० पोती तूर विकली गेली. यापैकी १४०० पोती तूर स्थानिक डाळ कारखानदारांनी घेतली. यावर्षी त्यांना तूरडाळीसाठी कोईमतूर, दावणगिरी, बेन्नूर, हुबळी, शिमोगा, म्हैसूर, कोल्हापूर या ठिकाणांहून मोठे गिऱ्हाईक मिळाले. त्यावर्षी डाळ कारखान्याच्या संख्येमध्ये एकाने भर पडून ही संख्या १२ इतकी झाली.[१२] इ. स. १९६१ मध्ये तुरीचे आवक नियमित होती, मात्र अपुऱ्या रेल्वे वॅगन्स पुरवठ्यामुळे येथील डाळीस गिऱ्हाईक कमी झाले. यामुळे तूरडाळीचे भाव साधारण राहिले. या वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे तुरीचे व डाळीचे भाव यामध्ये तफावत दिसून आली नाही. कारण आवक योग्य होती, पण रेल्वे वॅगन्सचा पुरवठा अपुरा होता. या वर्षामध्ये बार्शीतून शिमोगा, धारवाड, बेळगाव, कोईमतूर, पुणे, हुबळी, म्हैसूर, कोल्हापूर या ठिकाणी प्रामुख्याने तूरडाळीची निर्यात झाली.[१३]

डिसेंबर १९६१ च्या सुरूवातीस ३००० क्विंटल तूरडाळीचे वायद्याचे सौदे झाले होते. पुढे जून १९६२ नंतर दक्षिण भारतातून तूरडाळीस प्रचंड मागणी वाढल्याने व बार्शी पेठेतील तुरीचे आवक संपुष्टात आल्याने जुलै अखेरीस तुरीच्या भावाने नवा उच्चांक गाठला होता. वाढत्या मागणीमुळे या वर्षी डाळ कारखान्यांच्या संख्येत भर पडून ही संख्या १५ इतकी झाली.[१४] डिसेंबर १९६२ च्या दुसऱ्या पंधरवाड्यामध्ये तुरीचे आवक सुरू झाली, ती जानेवारी १९६३ मध्ये खूप वाढली. त्यामुळे तुरीचे भाव घसरले. तर डाळीचे भाव ६४ ते ६८ रूपये प्रती क्विंटल इतके झाले. फेब्रुवारी व मार्च १९६३ मध्ये तूरडाळीची मागणी वाढल्याने तसेच रेल्वे वॅगन्सचा पुरवठा समाधानकारक झाल्याने तूरडाळीचे भाव ७१ ते ७५ रूपये प्रती क्विंटल इतके वाढले. पुढे एप्रिलमध्ये तुरीची आवक रोडावल्यामुळे तूरडाळीचे भाव ८५ ते ९० रूपये प्रती क्विंटल इतके प्रचंड वाढले होते. बार्शी बाजारपेठ ही प्रामुख्याने दक्षिण भारतात तूर डाळीसाठी प्रसिध्द आहे. या भागातून होणाऱ्या तूर डाळीच्या सततच्या वाढत्या मागणीमुळे बार्शीमध्ये डाळ कारखानदारीला चांगले दिवस आले. त्यामुळे या वर्षामध्ये बार्शीत नवीन ७ डाळ कारखान्याची भर पडून या वर्षाखेर येथील डाळ कारखान्यांची संख्या २२ इतकी झाली.[१५]

तुरीचे विक्री जलद गतीने होण्यासाठी इ. स. १९६४ मध्ये बार्शी मार्केट क्षेत्रात प्रतवार पध्दतीचा अवलंब केला. त्यामुळे येथील डाळ कारखानदारांना आवश्यक असाच माल घेण्याची संधी मिळाली. या वर्षात डाळ कारखानदारांनी प्रामुख्याने ' गजर ' व ' लाल तूरी ' ची खरेदी केली. या वर्षीही बार्शीमध्ये एका डाळ कारखान्याची भर पडून त्यांची एकूण संख्या २३ इतकी झाली.[१६]

२४ डिसेंबर १९६४ पासून सरकारच्या परवानगीशिवाय महाराष्ट्राबाहेर तूर, मुग, तूरडाळ, मुगडाळ पाठविण्यास किंवा आयात करण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे तुरीचे भाव मंदावले. परप्रांतांतून मागणी असूनही केवळ बंदीमुळे तूरडाळ बाहेर पाठविता आली नाही. तरीही बार्शीच्या तूरडाळीस मुंबई, पुणे, कराड, कोल्हापूर व कोकण भागातून मागणी राहिली. अशाही स्थितीमध्ये हा उद्योग आपले मजबूत अस्तित्व टिकवून होता. या प्रांतबंदीच्या काळातही बार्शीच्या तूरडाळीला ११२ ते ११६ रूपये प्रती क्विंटल इतका भाव होता.[१७]

प्रांतबंदीमुळे तालुक्यातील डाळ कारखानदाराकडे तूरडाळीचे जुने साठे शिल्लक होते. २५ जानेवारी १९६६ मध्ये तूरडाळीची निर्यात बंधमुक्त केल्यामुळे तालुक्यातील डाळ कारखानदारीने जास्त जोर पकडला.[१८]

इ. स. १९६६-६७ मध्ये पावसाच्या अभावामुळे तुरीचे पीक बेताचेच होते. मात्र तालुक्यातील डाळ कारखानदारांकडे जून्या तूरडाळीचे साठे वाढत्या भावाच्या अपेक्षेने अडकून पडले होते. जुन्या तूरडाळीचे भाव १०८ ते ११२ रूपये प्रती क्विंटल असे होते. नवीन डाळीस अद्यापही गिऱ्हाईक नव्हते. त्यामुळे डाळ कारखानदार तूर घेण्यास उत्सूक नव्हते. जानेवारी १९६७ अखेर तूरडाळीस तूतीकोरीन, मडगाव, हुबळी, कोईमतूर या पेठेतून मागणी वाढल्याने तूरडाळीचे भाव ११० ते ११५ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. मे १९६७ मध्ये तर तूरडाळीचे भाव १६० ते १७० रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले.[१९]

**बार्शी पेठेतील तुरीची आवक व किंमत (इ. स. १९५१-१९९०)**

| वर्ष | आवक | किंमत (रू) |
|---|---|---|
| **१९५१-५२** | १,१९,७३९ मण | १६,८६,५३९ |
| **१९५५-५६** | १,९५,१८५ मण | ०३,३६,५५२ |
| **१९६१-६२** | १,४०,४८५ क्विंटल | ५४,८२,१९२ |
| **१९६५-६६** | ३१,५१७ क्विंटल | २६००,३७३ |
| **१९७१-७२** | ९,३९६ क्विंटल | १०,६२,३९८ |
| **१९७७-७८** | ५७,८४१ क्विंटल | ०१,६७,९२,२६९ |
| **१९८५-८६** | ७७,२५६ क्विंटल | ०२,७६,९७,०६२ |
| **१९९०-९१** | १,३९,६२८ क्विंटल | ११,७०,७७,५०० |

**(संदर्भ :- कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, संबंधित वर्ष.)**

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६८ मध्ये तूरडाळीचे भाव १८० ते २५० रूपये प्रती क्विंटल इतके वाढले. हा या वर्षापर्यंतचा सर्वात जास्त भाव होता. तुरीच्या प्रतवार विक्री पध्दतीमुळे या पेठेमध्ये तुरीची आवक प्रचंड वाढली. मात्र सर्वत्र डाळीचा भरपूर पुरवठा झाल्यामुळे तुरीस मागणी कमी झाली. असे असले तरी तूरडाळीला आलेल्या प्रचंड भावामुळे तालुक्यातील डाळ कारखानदारांचा खूप फायदा झाला.[२०] इ. स. १९७१ साली मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने डाळ कारखानदारांची तुरीची मागणी घटली. कारण पावसाळ्यामध्ये तूरडाळ वाळविता येत नाही. त्यामुळे या वर्षी केवळ ९ डाळ कारखाने सुरू होते.[२१]

इ. स. १९७१-७२ मध्ये आवर्षणामुळे तुरीचे आवक ६७ हजार क्विंटल वरून ती ९ हजार क्विंटलवर आली. पीकपाण्याच्या अंदाजावरून तालुक्यातील डाळ कारखानदारांनी १४२ रूपये प्रती क्विंटल याप्रमाणे तूर खरेदी केली, पण तूरडाळीस फारशी मागणी नसल्याने तुरीचे भाव पुन्हा घटले.[२२]

इ. स. १९७२-७३ मध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीची फार दुरावस्था झाली. पण तरीही बार्शी पेठेमध्ये तुरीचा व्यापार चांगला झाला. तूरीचे भाव २३५ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. तालुक्यातील डाळ कारखानदारांना याचा फायदा झाला. इ. स. १९७२-७३ च्या दुष्काळातही येथील डाळ कारखानदारी चांगल्या अवस्थेत होती.[२३] इ. स. १९७४-७५ मध्ये केरळ, पश्चिम बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, या राज्यांमध्ये तालुक्यातून मोठ्या प्रमाणात तूरडाळीची निर्यात झाली. या वर्षात तूरडाळीचे भाव चांगले व टिकून होते.[२४] इ. स. १९६२ मध्ये लघु उद्योगांतर्गत जिल्ह्यामध्ये फॅक्टरी ॲक्ट अंतर्गत १३ डाळ कारखाण्याची नोंद झाली होती. इ. स. १९७७ पर्यंत ही संख्या २३ पर्यंत गेली. यापैकी ५ डाळ कारखाण्याचे सर्वेक्षण करण्यात आले. या ५ पैकी ३ डाळ कारखाने बार्शी तालुक्यात होते. वर्षातून हे कारखाने ८ ते १० महिने चालत.[२५] इ. स. १९७७-७८ मध्ये तुरीचे पीक कमी आल्याने बाजारात सर्वत्र याची टंचाई दिसून आली. परिणामी तूरडाळीचे भाव आकाशाला भिडले. या वर्षामध्ये येथील डाळ कारखानदारांनी गुजरात, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यात मोठ्या प्रमाणात डाळीची निर्यात केली.[२६]

इ. स. १९८५-८६ मध्ये तुरीची आवक मोठ्या प्रमाणात टिकून होती. तुरीचे भावही ३४५ ते ५६८ रूपये प्रती क्विंटल पर्यंत वाढले. या वर्षी प्रामुख्याने तालुक्यातील स्थानिक डाळ कारखानदारांनीच मोठ्या प्रमाणावर तूर खरेदीदार होते. या वर्षामध्ये स्थानिक डाळ कारखानदारांनी तामिळनाडूमध्ये ४२ रेल्वे वॅगन्स शिवाय मुंबई व पुणे या पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात डाळीची विक्री केली.[२७]

**बार्शीतून होणारी तूरडाळीची निर्यात (प्रमाण : रेल्वे वॅगन्स)**

| इ. स. | निर्यात | इ. स. | निर्यात |
|---|---|---|---|
| **१९५१-५२** | १२४ | **१९६५-६६** | १४७ |
| **१९५६-५७** | १२४ | **१९६६-६७** | १३६ |
| **१९५९-६०** | ८६ | **१९७०-७१** | ४१ |
| **१९६०-६१** | ८९ | **१९७१-७२** | ४३ |
| **१९६१-६२** | १२० | **१९७३-७४** | २१ |
| **१९६२-६३** | १२४ | **१९७४-७५** | २५ |
| **१९६३-६४** | २४० | **१९७५-७६** | ७० |
| **१९६४-६५** | ५५ | **१९७७-७८** | १४ |

**(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वाषिक अहवाल, इ.स. १९५४-५५ते १९७७-७८.)**

इ. स. १९८७-८८ मध्ये बार्शी पेठेत तुरीची आवक मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे वर्षभर डाळ कारखानदारांची खरेदी टिकून होती. याही वर्षात तामिळनाडूमध्ये मोठ्या प्रमाणात डाळीची निर्यात झाली. या वर्षाखेर तालुक्यातील डाळ कारखान्यांची संख्या २६ इतकी झाली.[२८]

इ. स. १९८७-८८ च्या तुलनेत इ. स. १९८८-८९ मध्ये तुरीची आवक २५ हजार क्विंटल कमी  झाली. तरी वर्षभर स्थानिक डाळ कारखानदारांनी तूर खरेदी केली. कारण तूरडाळीला दक्षिणेतील आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गोवा राज्याप्रमाणेच राज्यात पुणे व मुंबई या भागांतून डाळीला वर्षभर मोठी मागणी होती.[२९]

बार्शीच्या व्यापार व उद्योग क्षेत्राच्या विकासामध्ये भर घालणाऱ्या विविध घराण्यामध्ये सोमाणी घराणे फार महत्वाचे मानले जाते. याचे सर्व श्रेय या घराण्यातील श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी यांच्याकडे जाते. खऱ्या अर्थाने या घराण्याच्या व्यापार उद्योगाचा प्रारंभ रामचंद्रभाऊ यांचे जेष्ठ बंधू मोतीलाल सोमाणी यांनी केला असला तरी त्याची वाढ व विकास कष्टाने व कल्पकतेने श्री. रामचंद्रभाऊ सोमाणी यांनीच घडवून आणली. उद्योगामध्ये विशेषतः बार्शीच्या डाळ उद्योगामध्ये सोमाणी घराणे अग्रेसर आहे. जवळ-जवळ ७५ वर्षांपेक्षा जास्त काळापासून डाळ उद्योगामध्ये हे घराणे कार्यरत आहे. या घराण्याची बार्शीतील व्यापाराची सुरूवात आडत दुकानापासून झाली.[३०]

हे सोमाणी घराणे मुळचे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यामधील तेर या गावचे आहे. त्यांचे वडील भगवानदास हे शेतकरी होते. मात्र त्यांना आपल्या मुलांनी चांगले उच्च शिक्षण घ्यावे असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी आपली तीन मुले मोतीलाल, रामचंद्र व द्वारकादास यांना शिक्षणासाठी बार्शीमध्ये पाठविले. येथूनच सोमाणी घराण्याचा व बार्शीचा सहवास सुरू झाला. या तीन बंधूंपैकी सर्वात जेष्ठ असणारे मोतीलाल सोमाणी यांनी सर्वप्रथम व्यापार-उद्योगामध्ये उडी घेतली. त्यांच्या आग्रहामुळेच रामचंद्र भाऊंनी व्यापारास सुरूवात केली. सातत्याने कष्ट करण्याच्या प्रवृत्तीमुळे अल्पावधीतच रामचंद्र भाऊंनी डाळ उद्योगामध्ये बार्शी सारख्या ठिकाणी चांगलाच जम बसविला. आपल्या डाळ कारखाण्यासाठी त्यांनी गुणवत्तेच्या आधारे दक्षिण भारतातील बहुसंख्य बाजारपेठा काबिज केल्या. डाळ कारखानदारीमध्ये त्यांनी आपले चिरंजीव मुकुंद व उज्वल तसेच नातू नवल यांना उद्योजकीय स्वातंत्र्य दिले. त्यामुळे हे कुटुंब बार्शीच्या डाळ उद्योगामध्ये खूप प्रसिध्दिस आहे.[३१]

श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी यांनी इ. स. १९५० मध्ये बार्शीमध्ये जामगाव रोड या ठिकाणी आपली स्वतंत्र डाळ मिल सुरू केली. या मिलमध्ये प्रामुख्याने तूर डाळीची निर्मिती केली जाते. गुणवत्तेनुसार या मिलमधील अनुक्रमे त्रिमूर्ती छाप, गणपती छाप व स्वस्तिक छाप हे डाळींचे तीन प्रमुख प्रकार आहेत. या उद्योगामधील विविध यंत्रांची सध्याची किंमत ६० लाख रूपये इतकी आहे. या मिलचे खेळते भांडवल ५० लाख रूपये इतके आहे. सदर भांडवल उभारणीमध्ये प्रामुख्याने बँकेचे सहकार्य लाभले. या कारखान्यामध्ये कामगारांची संख्या २० इतकी आहे. यामध्ये १५ कामगार बार्शी तालुक्यातील आहेत तर ५ कामगार बिहारचे आहेत. या कामगारांना दररोज ३०० ते ५०० रूपयांपर्यंत वेतन दिले जाते. कारखान्यातील कामगारांना विविध सणांना भेटवस्तू दिल्या जातात. शिवाय प्रसंगानुरूप योग्य ती मदत केली जाते. या कारखान्यामधून वार्षिक २० हजार क्विंटल डाळीचे उत्पादन घेतले जाते. या उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल बार्शी तालुका, मराठवाडा, विदर्भ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश अशा विविध ठिकाणांहून आणावा लागतो. पूर्वी हा कच्चा माल केवळ स्थानिक व मराठवाड्यामधून उपलब्ध होत होता. मात्र लातूर, माजलगाव, बीड येथे डाळींचे कारखाने सुरू झाल्यामुळे  मराठवाड्यातून या कारखान्यासाठी येणाऱ्या कच्च्या मालाचे प्रमाण कमी झाले आहे. मोतीलाल सोमाणी यांची विजयकुमार, विनोदकुमार, जुगलकिशोर व श्रीवल्लभ अशी चार मुले स्वतंत्रपणे डाळ उद्योगामध्ये कार्यरत आहेत. या प्रत्येकाच्या डाळ मिलचे भांडवल ९० लाखापेक्षा जास्त आहे. या भांडवल उभारणीमध्ये बँकांचा मोठा वाटा आहे. या मिलचा प्रत्येकी वार्षिक खर्च ४५ ते ५० लाख रूपये इतका आहे. या प्रत्येकाच्या डाळ मिलमधील कामगारांची संख्या २० पेक्षा जास्त असून त्यांना महिना ३ ते ५ हजार रूपये वेतन दिले जाते. कामगारांचे कामाचे ८ तास असतात.[३२]

श्री. शामसुंदर शंकरलाल पुरोहित यांनी इ. स. १९७० मध्ये बार्शी येथे ' राम डाळ मिल ' ची स्थापना केली. या मिलमधून तूरडाळीचे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. या कारखान्याचे एकूण भांडवल ९० लाख रूपये इतके आहे. याचा प्रमुख आधार बँक आहे. या मिलमध्ये ९ स्त्रिया व १२ पुरूष कामगार आहेत. त्यांना महिना ३ ते ५ हजारापर्यंत वेतन दिले जाते. अर्थात आवश्यकतेनुसार कामगारांना विविध सोयी-सवलती दिल्या जातात. या मिलसाठी आवश्यक असणारा कच्चा माल प्रामुख्याने स्थानिक व आसपासच्या परिसरातून येतो.

कच्चा माल, वाहतूक, मजूरी, जाहिरात, कर्ज व इतर खर्च असा एकूण ३० लाख रूपये या डाळ मिलचा वार्षिक खर्च आहे. येथे तयार होणारी डाळ प्रामुख्याने महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, मुंबई अशा विविध बाजारपेठांमध्ये पाठविली जाते. उत्तम प्रतीच्या डाळ निर्मितीबरोबरच कामगारांच्या हितसंवर्धनाला या मिलमध्ये प्राधान्य दिले जाते. म्हणूनच ऐन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर स्थापन झालेल्या या मिलने उत्तम व्यवस्थापनाच्या माध्यमातून आजतागायत आपले अस्तित्व जपत बार्शीच्या डाळ कारखानदारीमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे.[३३]

**बार्शी तालुक्यातील डाळ कारखाने (इ. स. १९९० पर्यंतचे)**

| अ. क्र | डाळ कारखान्याचे नाव |
|---|---|
| १) | श्री. वालचंद लालचंद भूमकर डाळ मिल्स |
| २) | श्री. गणपती विठोबा चव्हाण डाळ मिल्स |
| ३) | श्री. रामचंद्र भगवानदास सोमाणी डाळ मिल्स |
| ४) | श्री. रामनिवास जवाहरमल डाळ मिल्स |
| ५) | श्री. आर. बद्रिनारायण काबरा डाळ मिल्स |
| ६) | श्री. महादेव भिकुप्पा कुंरा डाळ मिल्स |
| ७) | श्री. चांदमल भूरमल डाळ मिल्स |
| ८) | श्री. बालाजी डाळ मिल्स |
| ९) | श्री. सत्यनारायण श्रीराम पुरोहित डाळ मिल्स |
| १०) | श्री. धोंडीराम नंदलाल डाळ मिल्स |
| ११) | श्री. पांडूरंग धनराज डाळ मिल्स |
| १२) | श्री. दगडू बसप्पा गाढवे डाळ मिल्स |
| १३) | श्री. रघुनाथ शिवरामजीअप्पा बंडेवार डाळ मिल्स |
| १४) | मे. गजानन डाळ मिल्स |
| १५) | मे. विश्वनाथ डाळ मिल्स |
| १६) | श्री. राजलक्ष्मी डाळ मिल्स |
| १७) | मे. अशोक डाळ मिल्स |
| १८) | श्री. तुळजाभवानी डाळ मिल्स |
| १९) | मे. जुगलकिशोर मोतीलाल सोमाणी |
| २०) | मे. गणेश डाळ मिल्स |
| २१) | मे. शशीकांत डाळ मिल्स |
| २२) | मे. सावला डाळ मिल्स |

**(संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षीक अहवाल, इ.स. १९५४-५५ते १९९०-९१.)**

बार्शीमध्ये दैनंदिन १०० क्विंटल क्षमतेपासून २००० क्विंटल क्षमतेपर्यंत डाळ निर्मिती करणारे कारखाने आहेत. येथील डाळ कारखानदारांनी बदलत्या काळाबरोबर आधुनिकतेचा स्विकार केल्यामुळेच येथे या व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. बार्शीमध्ये मैनुद्दीन तांबोळी यांच्या बाबा इंडस्ट्रिज व व्ही. सी. पी. इंडस्ट्रिज हे दोन मोठे डाळ कारखाने आधुनिक पध्दतीने व मोठ्या क्षमतेने सुरू आहेत. या डाळीबरोबरच या कारखान्यांतून जनावरासाठी खाद्य म्हणून कळणादेखील निर्माण केला जातो. याला शेतकरी वर्गातून खूप मागणी आहे. तूर डाळीबरोबरच हरभरा, मुग, उडीद आदी प्रकारच्या डाळीचेही बार्शीमध्ये उत्पादन घेतले जाते. देशाच्या विविध भागात बार्शीतील डाळीचे हरण छाप, ५०१ छाप, उडता घोडा, बाबा डिलक्स, बाबा ऑरेंज असे अनेक ब्रँड प्रसिध्द आहेत. या डाळ कारखानदारीमुळे सुमारे १००० लोकांना रोजगार मिळाला आहे. बार्शीतील कारखानदारांनी वाढत्या स्पर्धेतही बार्शीच्या डाळीचा दर्जा राखण्यामध्ये यश मिळविले आहे.[३४]

बार्शी शहरातील विविध डाळ कारखान्यामध्ये विविध जाती-जमातीचे लोक एकत्र काम करू लागले. या उद्योगामुळे बार्शी तालुक्यामध्ये फार मोठया प्रमाणामध्ये रोजगार निर्मिती झाली. विचारांचे आदानप्रदान होऊ लागले. हे कामगार एकमेकांच्या सुख दुखाःत सहभागी होऊ लागले. सामाजिक व धार्मिक विषमता कमी होण्यास मदत झाली. यातून जातीय सलोखा व सामाजिक समता निर्माण होण्यास मोठी मदत झाली. भारतीय उद्योगामध्ये स्त्रियांना अत्यंत नगण्य असे स्थान होते. परंतू बार्शी तालुक्यातील डाळ उद्योगामध्ये अगदी सुरूवातीपासून महिला पुरूषाच्या बरोबरीने काम करत आहेत. थोडक्यात समाजातील हीन समजल्या जाणाऱ्या वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे कार्य तालुक्यातील डाळ उद्योगांनी काही प्रमाणात केले आहे. या उद्योगामुळे तालुक्याचे वाहतूक क्षेत्रामध्ये झपाटयाने विस्तारले. पूरक व्यवसायांना प्रोत्साहन मिळाले. यातून तालुक्याच्या आर्थिक विकासाला कमालीची गती मिळाली.

बार्शी शहरातील असा हा वैभवशाली डाळ उद्योग विजेची समस्या, कामगारांचे असहकार्य व इतर काही सोयीसुविधांच्या अभावामुळे सद्या अडचणीत आला आहे. त्यामुळे शासनाने तालुक्यातील डाळ कारखाण्यासाठी एखांदे विशेष पॅकेज जाहीर करून या उद्योगाला दिलासा देणे आवश्यक आहे.

### संदर्भ साधने


**१)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.२७५ ते २९०.

**२)** भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ.१३, १४.

**३)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.३०१, ३०३.

**४)** भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९६१, पृ.३.

**५)** गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.१, २६१, २६२, ३०३.

**६)** स्मृतिगंध स्मरणिका, कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, ७ जुलै १९७६.

**७)** कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५४-५५, पृ. १०, ११, २०.

**८)** कित्ता, इ. स. १९५६-५७, पृ. ७, ८, १०, १५, १६.

**९)** कुलकर्णी. डी. पी., शेतीमालाची बाजारव्यवस्था, ८ऑक्टोबर १९६२, पृ. २७६, २७७, २८२, २८३.

**१०)** कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ. स. १९५७-५८, पृ. ८, १३.

**११)** कित्ता, इ. स. १९५८-५९, पृ. ९, १५.

**१२)** कित्ता, इ. स. १९५९-६०, पृ. ९, १०, १७.

**१३)** कित्ता, इ. स. १९६०-६१, पृ. १३.

**१४)** कित्ता, इ. स. १९६१-६२, पृ. १४, १५, १९.

**१५)** कित्ता, इ.स. १९६२-६३, पृ. ६, १०.

**१६)** कित्ता, इ. स. १९६३-६४, पृ. ७, ९, १०.

**१७)** कित्ता, इ. स. १९६४-६५, पृ. ६, ७.

**१८)** कित्ता, इ. स. १९६५-६६, पृ. ७.

**१९)** कित्ता, इ. स. १९६६-६७, पृ. ९ ते ११.

**२०)** कित्ता, इ. स. १९६७-६८, पृ. १०.

**२१)** कित्ता, इ. स. १९७०-७१, पृ. ८, १४.

**२२)** कित्ता, इ.स. १९७१-७२, पृ. ८, ९.

**२३)** कित्ता, इ.स. १९७३-७४, पृ. ७.

**२४)** कित्ता, इ.स. १९७४-७५, पृ. १०.

**२५)** महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, सोलापूर जिल्हा, इ. स. १९७७, पृ. ३९०.

**२६)** कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी, वार्षिक अहवाल, इ.स. १९७७-७८, पृ. ५, ४६.

**२७)** कित्ता, इ.स. १९८५-८६, पृ. ४.

**२८)** कित्ता, इ.स. १९८७-८८, पृ. ४, ७.

**२९)** कित्ता, इ.स. १९८८-८९, पृ. ४.

**३०)** मुलाखत, श्री. रामचंद्रभाऊ भगवानदास सोमाणी, डाळ उद्योजक बार्शी.

**३१)** दैनिक जनता दरबार, ११ ऑगस्ट २०१०, पृ. १, २.

**३२)** प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळालेली माहिती.

**३३)** मुलाखत, श्री. शामसुंदर शंकरलाल पुरोहित, डाळ उद्योजक बार्शी.

**३४)** दैनिक लोकमत, २१ मे २०१३, पृ. १८.